
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# संत नामदेवाच्या अभंगातील लोकमनाचे विश्लेषण

डॉ. संभाजी शिवाजी जाधव
मराठी विभाग प्रमुख , कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय,
उमरी , ता. उमरी जि. नांदेड.

**प्रस्तावना :**




वारकरी संतांनी मन रया विषयावर अभंगात मोठया प्रमाणावर लेखन केले आहे. मन हा त्यांच्या चिंतनाचा विषय असून, सर्व विचारांच्या, त्यांच्या मुळाशी मनच असते. त्यामुळे मन हा विषय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला. मन हे चंचल आहे, संकल–विकल्पात्मक आहे, लंपट आहे, तसेच ते प्रामाणिक, कष्टीही आहे. प्रत्येक कार्य सिध्दीला नेण्याची क्षमता मनात असते, याची जाणीव संतांना होती. म्हणून त्यांनी मनाचे मानसशास्त्रीय पातळीवर विश्लेषण करून त्यातील क्षमता, गुण, दोष तपासले आहेत. "मनुष्य देवाकडे का वळतो किंवा परमार्थाकडे का वळतो हा ससाक्षात्कार शास्त्रातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर अगदी थोडक्यात सुखासाठी वळतो असे देता येईल. मानवी जीवनातील अपूर्णता व दोषमयता, मनुष्याची सदाचरणाकडे असणारी स्वाभाविक प्रवृत्ती व विश्वाची विशालता आणि नियमबध्दता पाहुन त्यातील गुढ उकलण्याची प्रेरणा या तील प्रकारच्या कारणांनी मनुष्याच्या मनाचा प्रक्षोभ होता व त्यातुन त्यांची नवजागृती होउन तो परमार्थाकडे वळतो."[1] असे मनाचे स्वरूपज ाणण्याचा अनेक अभंगातून संत नामदेवांनी प्रयत्न केला आहे.

संत नामदेव मन या विषयावर जे लेखन केले आहे, ते अंतर्मुख करणारे आहे. ते मनाकडे त्रयस्तपणे पाहतात, त्याच्या सर्व गुण अवगुणाचा विचार करतात, मनाच्या चंच लते विषयी लिहताना म्हणतात, "क्षण एक मना बैसोनि एकांती । विचारी विश्रांती कोठे आहे ।।1।। लक्षचौ–यांशीच्या करितां यंरझारा । शिणलासी गव्हारा वेळोवेळां ।।2।। अझुनि तुज लाज न वाटे पौं कैसी । नरकाचे व्दारांसि जावें किती ।।3।। दुर्लभ आयुष्य मनुष्य देहीचें । जातसे मोलाचें वायाविण ।।4 ।। खापराचे साठी सांडिला परिस । गहिंवरे फुटतसे –हदय माझे ।।5।। नामा म्हणे तुजलचि यंतो काकुळती । सोडिरे संगती वासनेची ।।6।।"[2] या अभंगातून प्रातिनिधीक लोकमनाचे विश्लेषण केले असून, ते मनाला प्रश्न विचारतात. सरळसरळ उपदेश करण्यापेक्षा येथे संवादात्मक शैलीचा वापर करून व्यक्तींना अंतर्मुख करतात आणि म्हणतात, क्षणभर तुम्ही विचार करा, विश्रांती कोठे आहे. येथे नामदेव लोकमनास विचार करण्यास प्रवृत्त करतात. कारण विचाराला चालना दिल्यानंतर पटलेला विचार खुप काळ टिकतो, याची जाणीव त्यांना आहे. सरळ उपदेश केल्यास लोक अल्पकाळ लक्षात ठेवण्याची व पुन्हा मूह मार्गावर येण्याची शक्यता असते. आयुष्याचे महत्त्व लक्षात आणून देवून ते लोकांचे पूर्ण परिवर्तन करू इच्छितात. यासाठी सलागणारी जनहिताची तळमळ त्यांच्याकडे आहे. म्हणून ते वासनेची संगत सोडण्यास सांगतात. येथे वासना हा शब्द व्यापक अर्थाने असून, त्यामुळे जीवन सफल होते, यी जाणीव त्यांना आहे. एवढया तळमळीने सांगून जर मन ऐकायला तयार नसेल , तर त्यास दोन शब्द

ऐकावयास ही ते मागे पुढे पाहत नाहीत. ते म्हणतात, "अरे मना तू मर्कटा । पापिया चांडाळा लंपटा । परव्दार हिंडसी सुनटा ।।1।। अरे तुंज पापावरी बहु गोडी । देवधर्मी नाही आवडी । तेणे न पावसी पैलथडी । कर्म बांदवडी पडिसील ।।2।। "[3] मन पुनः पुन्हा वासनेकडे ओढ घेते, हे लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी हा अभंग योजिला आहे. कारण संत नामदेव येथे सामान्य माणसाच्या मनःपातळीवर येतात. सामान्य माणसाचे मन वारंवार ओढ घेते, पण त्यावर नियंत्रण आणले पाहिजे, याची जाणीव त्यांना आहे. त्यासाठी त्यांनी मनाची चंचलता अफाट असते, ते परव्दार सुनटासारखे फिरते, हे दाखवून दिले आहे.

संत नामदेव मानवी मनासंबंधी मूलभूत चिंतन करून त्याच्या वृत्ती—प्रवृत्ती, विचार—विकार, मनासोबतचा संघर्ष व्यक्त करतात, "नको नको मना हिंडो दारोंदारी । कष्ट जाले भारी वायांविण ।।1।। कल्पना सांडोनि संतासंगे राही । सर्व त्यांचे पायीं सुख आहे ।।2।।"[4] मनाची चंचलता कमी झाली पाहिजे, ते सारखे फिरते. त्यामुळे अनेक दुःखे वाटयाला येतात, याची जाणीव सामान्य माणसांना संत नामदेव करून देतात. संतांची संगत म्हणजे सज्जनांची संगत त्यांना अपेक्षित असावी. ती व्यक्तीने धरली पाहिजे, हयातच त्याचे कल्याण आहे, याची जाणीव ही ते करून देतात.

मनाची सहनशीलता व संयम असला पाहिजे, अन्यथा त्याचे परिणाम भयावह असतात. नामदेव हे सांगताना रावण, दशरथ, हिरण्यकशिपू अशा पौराणिक व्यक्तींची उदाहरणे देवून सामान्य माणसाच्या मनावर कांही संस्कार करू इच्छितात, ते म्हणतात, "अरे मना सोस कां करिसी किती । हे तवं वायां धनसंपत्ति । आयुष्य भविष्य नाहीं तुझिये हाती। हे अवघे अंती जायजणो ।।1।।"[5] मानवी जीवनात महत्त्वपुर्ण बाब म्हणजे भविष्य याची काळजी तो फार करीत असतो. याची जाणीव संत नामदेव जाणीवपूर्वक करून देतात. जीवनात संपत्ती आवश्यक आहे, पण काही मर्यादेपर्यंत या सर्वाचा अतिरेक करणा—या पौराणिक व्यक्तीची काय अवस्था झाली, ते उदाहरणासह सांगतात व सामान्य माणसाच्या मनातील अतिरेकी हाव कमी करून त्यास एक सज्जन माणूस बनविण्यास ज्ञानाचे महत्त्व सांगताना म्हणतात, "मन माझें आंधळे कपाटाचें कवाडें । भक्ता केंवि उघडे ज्ञानेविण ।।1।।"[6] ज्ञानाशिवाय मनाचे दरवाजे उघडणारे नाहीत. मन ज्ञानाने प्रसन्न होते. या बाजूने आशयाकडे आपण बघितल्यास ज्ञानाचे महत्त्व मानवी जीवनातील संत नामदेवांनी चपखलपणे सांगितल्याचे दिसून येते. मन आणि ज्ञान या दोन्ही बाबी या दोन्ही बाबी महत्त्वपुर्ण आहेत. ज्ञानाशिवाय मन आणि मनाशिवाय ज्ञानाने माानवी जीवनाला पुर्णत्वाकडे नेवूशकते याची जाणीव संत नामदेव करून देतात.

संत नामदेवांनी कर्तृत्वाचे महत्त्व मानवीजीवनात महत्त्वपुर्ण मानले आहेत. स्वतःच स्वतःचा उध्दार करणे म्हणजे दुस—यावर विसंबून न राहणे, कर्तृत्वान बनने हा विचारही त्यांच्या अभंगात आहे. पण कर्तृत्वाच्या मूळाशी ही मन आहे हे सांगताना म्हणतात, "मीच माझा देव मीच माझा भक्त । मी माझा कृतार्थ सहज असे ।।1।।"[7] स्वतःच देव आणि भक्त असणे हा विचार मानवी जीवनाला श्रेष्ठत्वाकडे नेणारा आहे. दुस—याच्या वैचारीक गुलामीपासून दुर नेणारा आणि आपल्या जीवनाचे बरे—वाईट करणारे आपणच आहोत दुसरे कुणीही नाही. मोक्ष हा केवळ भ्रम आहे. ही मनाला पडलेली भ्रांती आहे. असा विश्वास मनाला देतात. समाजात दबलेल्या, खंगलेल्या व्यक्तींना हा विचार नक्कीच आत्मविश्वास देतो. आणि सामान्य माणसाला प्रेरीत करतो. तो दुःखाला बाजुला सारून जीवन आनंदाने जगण्यास प्रेरित होतो. आपण आपले कल्याण करू शकतो याची त्यास जाणीव होते. त्यामुळे पारंपरिक गुलामीतन त्याला मुक्त होण्याची एक संधी मिळते. पण त्यासाठी संगत महत्त्वपुर्ण आहे. "मन माझे चोरटें लागलें कुसंगी । बांधिले षड्वर्गी धरोनि त्यातें ।।1।।"[8] त्याला जर कुसंगत लागली तर अनेक दोष निर्माण होतात. मग ते वासनेच्या आहारी जाते. आशा, तृष्णा या नानाविध इच्छा निर्माण करतील त्यामुळे मन हे महत्त्वपुर्ण असून त्याची प्रसन्नता व निर्दोषता अत्यंत आवश्यक आहे. याची जाणीव संत नामदेवांनी आपल्या अभंगातून दिल्याचे लक्षात येते.

## संदर्भ सुची


1. तुळपुळे शं. गो., संतवाणीतील पंथराज, मेहत्ता पब्लिशिंग हाडस, पुणे, व्दितीयावृत्ती 1994, पृष्ठ. 18.
2. श्री नामदेव गाथा, महाराष्टभ राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई पुनर्मुद्रण 2008, पृष्ठ क्र. 762.
3. तत्रैव, पृष्ठ क्र. 761.
4. तत्रैव, पृष्ठ क्र. 751.
5. तत्रैव, पृष्ठ क्र. 764.

6. तत्रैव, पृष्ठ क्र. 651.
7. तत्रैव, पृष्ठ क्र. 681.
8. तत्रैव, पृष्ठ क्र. 576.

LBP PUBLICATION